ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-VII DEC. 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कॉपी करण्याच्या प्रवृत्तीचा अभ्यास"

**प्रा. शेख अ.तय्यब साहेबलाल,**

सहाय्यक प्राध्यापक,

मातोश्री गिरीजाबाई ढोबळे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

जुळे सोलापूर, सोलापूर.

मोबाईल नंबर :– ९९२१८२८२०५.

- **प्रस्तावना : –**

आजच्या या संगणकाच्या युगामध्ये विद्यार्थी ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण घेण्याऐवजी केवळ पदवी प्राप्त करण्यासाठीच शिक्षण घेत आहे असे दिसून येते.परीक्षा ही तीन अक्षरी शब्द पण बटू वामनाने जसे तीन पावलांत त्रैलोक काबीज केले. तसे विद्यार्थ्यांचे जीवन या परीक्षांनी काबीज केले आहे. शिशू वर्गात प्रवेश घेण्यासाठी बालकांना परीक्षा द्यावी लागते पुढे पदव्युत्तर शिक्षणापर्यंत तरी विद्यार्थ्यांची पाठ ही परीक्षा सोडत नाहीत्र शिक्षणाचे आराखडे बदलत गेले पण परीक्षा पध्दत काही बदलली नाही. १० + २ च्या आकृती बंधात तर इयत्ता १० वी ते १२ वी च्या परीक्षांना तर अवास्तव महत्त्व दिले गेले आहे. स्पर्धा व धावपळ वाढत चालली तसतसा विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक गुणांचा ध्यास वाढत गेला.

त्यामुळे पदवी मिळविण्यासाठी सर्वात जवळचा सोपा मार्ग अंवलंबण्याचा प्रयत्न विद्यार्थी करतो आहे. विषयाचे सखोल ज्ञान घेऊन विषय समजून घेऊन मग परिक्षा देण्याऐवजी सरळ तो उत्तरे पाहून म्हणजेच कॉपी करुन उत्तरे लिहिण्याची प्रवृत्ती बहुतांश विद्यार्थ्यांत वाढत चाललेली दिसुन येत आहे.

परंतू याचा जो वाईट परिणाम इतर प्रामाणिक, हुशार व सतत हजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर होतो याचे गांभीर्य लक्षात घेऊन संशोधकाने ही समस्या सोडविण्यासाठी हा संशोधन प्रकल्प निवडला आहे.

अभ्यासात हुशार नसतानाही व सतत गैरहजर राहुनही परीक्षेत कॉपी करुन पास होऊन किंवा प्रथम नंबर आणून हे विद्यार्थी प्रामाणिक विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी होतात.

कारण पुढील प्रत्येक संधी ही त्याच्याच वाटेला येते व शैक्षणिक दर्जा खालावतो हा दर्जा उंचावण्यासाठी चांगल्या व प्रामाणिक विद्यार्थ्यांना संधी मिळण्यासाठी कॉपी प्रवृत्तील आळा घालून त्यावर काही उपाय योजना आखता येतात का? याचा विचार केला पाहिजे म्हणून संशोधकापने दुरगामी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून कॉपीच्या प्रवृत्तीची कारणे व उपाययोजना करण्यासाठी हा संशोधन प्रकल्प निवडला आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे :–**

१. अभ्यासक्रमाची आकर्षकता वाढवून तो व्यवहारीक दृष्ट्या कसा उपयुक्त करता येईल यासाठी मदत होईल.
२. हुशार, अभ्यासू, बुध्दिमान, प्रामाणिक, दररोज हजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवरील होणारा अन्याय थांबवण्यास मतद होईल.
३. परिक्षक, विद्यार्थी, पालक, परीक्षा आयोजित करणारी मंडळे व शिक्षक यांनाही त्यांच्या समस्येचे उत्तर मिळण्याबाबत मदत होईल.
४. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणण्यात मतद होईल.
५. हे संशोधन शाळांना उपयुक्त ठरणार आहे.

- **संशोधनाची गरज –**

१. अभ्यासाकडे दुर्लक्ष करणे, विषय समजून न घेणे, सतत गैरहजर राहणे, खोड्या करणे, तरीही कॉपी करुन पास होतो म्हणून हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय होतो यासाठी संशोधनाची गरज आहे.
२. इयत्ता ८ वी ९ वी विद्यार्थ्यांची कॉपी करण्याची प्रवृत्ती कशी आहे यासाठी संशोधनाची गरज आहे.
३. विद्यार्थ्यांना शिकताना काही अडचणी येतात का यासाठी संशोधनाची गरज आहे.
४. कॉपी विद्यार्थीच करतो का त्याला कोण प्रवृत्त करतो यासाठी संशोधनाची गरज आहे.
५. कॉपीबाबत शिक्षकांच्या प्रतिक्रिया, पालकांची मते कोणती आहेत त्यानूसार समस्येला आळा घालता येईल यासाठी संशोधनाची गरज आहे.

- **संशोधनाचे महत्त्व : —**

१. अभ्यासक्रमाची आकर्षकता वाढवून तो व्यवहारीकदृष्ट्या कसा उपयुक्त करता येईल यासाठी मदत होईल.

२. हुशार, अभ्यासु, बुध्दिमान, प्रामाणिक, दररोज हजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवरील होणारा अन्याय थांबवण्यास मदत होईल.

३. परिक्षक, विद्यार्थी, पालक, परीक्षा आयोजित करणारी मंडळे व शिक्षक यांनाही त्यांच्या समस्येचे उत्तर मिळण्याबाबत मदत होईल.

४. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणण्यास मदत होईल.

५. हे संशोधन शाळांना उपयुक्त ठरणार आहे.

- **संशोधनाची व्याप्ती : —**

१. सदर संशोधनात माध्यमिक स्तराचा विचार केला जाणार नाही.

२. सदर संशोधनात इयत्ता ८ वी व इयत्ता ९ वी च्या वर्गाचा विचार केला जाणार आहे.

३. सदर संशोधनात परीक्षेत कॉपी करणाऱ्या प्रवृत्तीचाच विचार केला जाणार आहे.

४. सदर संशोधनात इयत्ता ८ वी व इ ९ वी या वर्गातील शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचा विचार केला जाणार आहे.

- **संशोधनाची गृहीतके : —**

१. इयत्ता ८ वी ते इ. ९ वी चे विद्यार्थी कॉपी करतात.

- **संशोधन समस्या विधान : —**

"माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कॉपी करण्याच्या प्रवृत्तीचा अभ्यास."

- **संशोधन समस्या विधान : —**

**१. माध्यमिक** : इयत्ता ८ वी ते इ. ९ वीत शिकत असलेल्या सर्व

**२. विद्यार्थी** : इयत्ता ८ वी ते इ. ९ वी मध्ये शिकत असलेले सर्व विद्यार्थी की ज्यांची कॉपी करण्याची प्रवृत्ती आहे.

**३. कॉपी** : परीक्षेमध्ये प्रश्नांची उत्तरे लिहिताना ती पाहून/बघून लिहिणे, शिक्षकांनी फळ्यावर उत्तरे लिहून देणे, उत्तरे डेक्सवर लिहणे इत्यादी प्रकारे परीक्षेत उत्तरे पाहून लिहणे म्हणजे कॉपी करणे होय.

**४. प्रवृत्ती** : एखादे कृत्य करण्याची सवय म्हणजे प्रवृत्ती होय.

- **संशोधन पध्दतीची निवड : –**

प्रस्तुत संशोधन समस्या ही माध्यमिक शाळेतील इयत्ता ८ वी इ. ९ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कॉपी करण्याच्या प्रवृत्तीचा अभ्यास करण्याच्या सद्यस्थितीशी संबंधित असून सद्य स्थितीची माहिती मिळविण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. संशोधन पध्दतीची निवड केल्यानंतर संबंधित माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने संशोधन साधनातील प्रश्नावलीची निवड केली आहे. संशोधकाने विद्यार्थी शिक्षक, पालक यांना प्रश्नावली देवून माहिती संकलन केलेली आहे.

- **नमुना निवड : –**

सदर संशोधनासाठी नमुना निवड म्हणून संशोधकाने निवड ही सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीने निवड केलेली आहे.

शाळा ४ टक्के निवड व त्यातील सर्व इयत्ता ८ वी व इ. ९ वी चे विद्यार्थी व शिक्षकांची निवड १०० टक्के जे इयत्ता ८ वी व इ. ९ वी ला शिकवतात ते, पालकांची निवड १०० टक्के ज्यांचे पाल्य इयत्ता ८ वी व इ. ९ वी शिकतात.

- **माहिती संकलन, विशदीकरण आणि अर्थनिर्वचन : –**

प्रस्तुत संशोधनाचा विषय माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांच्या कॉपी करण्याच्या प्रवृत्तीचा अभ्यास असल्याने संशोधकाने आवश्यक ती माहिती विद्यार्थी, शिक्षक व पालकांकडून प्रश्नावलीच्या साह्याने संकलित केली आहे. संकलित केलेल्या माहितीचे विशदीकरण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधकाने कोष्टकांचा, ताळ्याच्या खुणा, शेकडा प्रमाण, आलेखांचा वापर केला याचा उपयोग संशोधकाला सदर संशोधनासाठी निष्कर्ष काढण्यासाठी आणि त्या आधारे शिफारशी लिहिण्यासाठी झाली आहे.

- **निष्कर्ष : –**

### ❖ विद्यार्थी प्रश्नावलीवरुन निष्कर्ष : –

१. ४२.६७ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, अभ्यासक्रम कठीण आहे म्हणून विद्यार्थी कॉपी करतात.

२. ७४.६७ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, शाळेतील शिक्षक, कारकुन व शिपाई विद्यार्थ्यांना कॉपी करण्यास मदत करत नाही असे आढळून आले.

३. ८८ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, आपल्या शाळेचा निकाल शंभर टक्के लागावा म्हणून मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना कॉपी करण्यास प्रोत्साहन दिले नाही असे आढळून आले.

४. ८६.६७ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, आपल्या विषयात सर्व विद्यार्थी पास व्हावेत म्हणून विषय शिक्षकांनी कॉपी करण्यासाठी मदत केली नाही असे वाटते.

५. ८८ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, आपल्या मुलाल परीक्षेत कॉपी करण्यास मदत केली नाही म्हणून पालकांनी पर्यवेक्षकाला दम दिला नाही असे वाटते.

६. ९३.३३ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, आपला मुलगा पास व्हावा म्हणून पालकांनी कधी कॉपी करण्यासाठी मदत केली नाही असे वाटते.

७. ५६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, विद्यार्थी कॉपी करताना पकडले गेल्यानंतर पालक पुन्हा कॉपी करु नको म्हणून समजावून सांगतात.

८. ७७.३३ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, पर्यवेक्षक कडक असावे असे वाटते.

९. ४० टक्के विद्यार्थ्याच्या मते, विद्यार्थ्यांच्या हाता – पायावर लिहले आहे का हे तपासावे असे वाटते.

### ❖ शिक्षक प्रश्नावलीवरुन निष्कर्ष : –

१. ७३.३३ शिक्षकांच्या मते, विद्यार्थी पास होण्यासाठी कॉपी करतात असे वाटते.

२. ७० टक्के शिक्षकांच्या मते, आजचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना लक्षात ठेवायला अवघड नाही असे वाटते.

३. ५६.३३ टक्के शिक्षकांच्या मते, शिक्षकांना परीक्षेमध्ये वस्तुनिष्ठ प्रश्नामुळे कॉपीचे प्रमाण वाढले आहे असे वाटते.

४. ७६.६७ टक्के शिक्षकांच्या मते, आपल्या शाळेचा निकाल शंभ टक्के लागावा म्हणून मुख्याध्यापकांनी कॉपी करण्यास प्रोत्साहन दिले नाही असे वाटते.

५. ७३.३३ टक्के शिक्षकांच्या मते, आपल्या विषयात सर्व विद्यार्थी पास व्हावेत म्हणून विषय शिक्षकांनी कॉपी करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत केली नाही असे वाटते.

६. ६० टक्के शिक्षकांच्या मते, आपला मुलगा परीक्षेत पास व्हावा म्हणून पालकांनी त्यास कॉपी करण्यासाठी मदत केली नाही असे वाटते.

७. ४६.६७ टक्के शिक्षकांच्या मते, पाल्य परीक्षेत पास व्हावा म्हणून पालक घरी अभ्यास घेतात असे वाटते.

८. ६० टक्के शिक्षकांच्या मते, परीक्षेमध्ये कॉपी होऊ नये म्हणून परीक्षेच्या वेळेस परिक्षेच्या वेळेस पर्यवेक्षक कडक असावे.

### ❖ पालक प्रश्नावलीवरुन निष्कर्ष : —

१. ४६.३३ टक्के पालकांच्या मते, पालकांना विद्यार्थी कॉपी पास होण्यासाठी करतात असे वाटते.

२. ५३.३३ टक्के पालकांच्या मते, विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत आपली इच्छा आग्रहाने आपल्या मुलांवर लादत नाही असे वाटते.

३. ३६.३७ टक्के पालकांच्या मते, विद्यार्थ्यांच्या कॉपी करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीस जबाबदार विद्यार्थ्यांचा अभ्यासाकडे असलेला उदासीन दृष्टीकोन आहे असे वाटते.

४. ९० टक्के पालकांच्या मते, आपला मुलगा परीक्षेत पास व्हावा म्हणून त्याला पालकांनी कॉपी करण्यासाठी मतद केली नाही असे वाटते.

५. ६६.६७ टक्के पालकांच्या मते, आपला पाल्य कॉपी करताना पकडला गेल्यानंतर पुन्हा कॉपी करु नको म्हणून समजावून सांगतात.

६. ५६.६७ टक्के पालकांच्या मते, आजची परीक्षा ही फक्त स्मरणशक्ती वर अवलंबून आहे व त्यात ओपन बुक टेस्ट बदल सुचवाल असे वाटते.

७. ८० टक्के पालकांच्या मते, परीक्षेमध्ये कॉपी होऊ नये म्हणून परीक्षेच्या काळात शाळेच्या आसपासची झेरॉक्स सेंटर बंद ठेवणे, हाता—पायावर लिहले आहे का तपासणे, कॉपी करणे हा गुन्हा आहे हे विद्यार्थ्यांना समजावणे, परीक्षेपूर्वी पालकसभा घेऊन पालकांना समजावणे इत्यादी सर्व पर्याय योग्य वाटते.

## ❖ शिफारशी : –

### १ पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम मंडळ शिफारशी :

१. सर्व प्रथम सध्याच्या अभ्यासक्रमाची विद्यार्थ्यांना सहज समजेल व आकर्षक वाटेल अशी रचना करावी.

२. व्यावहारीकदृष्ट्या उपयुक्त प्रकरणे अभ्यासक्रमात असावी.

### २ परीक्षा मंडळ शिफारशी : –

१. बौध्दीक मुल्यमापनाऐवजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांनाही वाव देणारी परीक्षा पध्दती हवी.

२. लघूत्तरी, दिघोत्तरी प्रश्नांचे प्रमाण वाढवावेत्र

३. परीक्षेची काठिण्य पातळी कमी असावी.

४. वर्षभरात घेतलेल्या ज्ञानकार्याचे मूल्यमापन करण्यासाठी जी प्रचलित परीक्षा पध्दती आहे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

५. प्रश्नपत्रिकेतील वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या कमी करावी.

६. इंग्रजी, गणित व विज्ञान सारख्या विषयासाठी बहुसंची प्रश्नपत्रिका योजना सुरु करणे.

### ३ शाळा शिफारशी :–

१. शिल्लक उत्तरपत्रिका व पुरवण्या यांची परीक्षेच्या वेळी दैनंदिन पडताळणी करणे.

२. परीक्षागृहात प्रवेश करण्यापूर्वी व नंतर विद्यार्थ्यांची तपासणी करावी.

३. रिलिव्हर म्हणून स्त्री शिक्षकांची नेमणूक करावी.

४. पेपर सुरु असताना सर्व पर्यवेक्षकांचे मोबाईल फोन केंद्रसंचालकांनी स्वत:च्या कस्टडीत सील बंद ठेवणे.

५. विषयज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी विविध संदर्भ पुस्तके तसेच विविध मासिकांची उपलब्धता करुन द्यावी.

६. केंद्रांतर्गत शिक्षकांच्या नियुक्त्या करताना काळजी घ्यावी.

## ४ मुख्याध्यापक शिफारशी :—

१. प्रात्यक्षिके, प्रकल्प, तोंडी प्रश्नोत्तरे, गट चर्चा, सादीकरण, यावर जास्त भर देणे.

२. कॉपी ची शिक्षा अधिक प्रभावी करणे.

३. परीक्षाकाळात पालकांना शाळेच्या आवारात बंदी करणे.

४. शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे बंद करुन त्यांच्या अध्यापन व मुल्यमापन ह्या गोष्टीवरच लक्ष केंद्रीत करुन पर्यवेक्षक कडक करणे.

५. परीक्षेच्या काळात पोलीस यंत्रणेचा वापर करणे.

६. शिक्षक — पालक मेळाव्यासह विद्यार्थी — शिक्षक — पालक मेळावा आयोजीत करुन कॉपीचे दुष्परिणाम व उपाय सांगावे.

७. कॉपीला आळा बसावा म्हणून भरारी पथके, बैठी पथके, परीक्षा कक्षामध्ये सी.सी. कॅमेराद्वारे व्हिडीओ चित्रीकरण करणे, जेणे करुन परीक्षेचे गांभीर्य विद्यार्थ्यांमध्ये येऊन कॉपीचे प्रमाण नाहीसे करणे.

## ५.शिक्षक शिफारशी :—

१. आपल्या अध्यापनातील तोच तो रटाळपणा सोडून आनंददायी अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या विषयाची गोडी निर्माण करणे.

२. शिक्षकांनी काही प्रमाणात दंडात्मक कारवाई अवलंबवावी.

३. पाठांतरापेक्षा अभ्यासक्रम समजून घेण्याची क्षमता व आवड शिक्षकांनी विद्यार्थ्यांत निर्माण करावी.

४. त्यासाठी प्रत्यक्ष कृती, अनुभव, दृक श्राव्य साधनांचा वापर, अध्यापनात विविधता, विविध अध्यापन पध्दतीचा वापर अशा मार्गाचा शिक्षकांनी वापर करावा.

५. शिक्षकांनी पर्यवेक्षक कडक करावे.

६. सराव परीक्षेतील चुका विद्यार्थ्यांना लक्षात आणून देऊन पुन्हा दुरुस्ती करुन दिल्या तर मुख्य परीक्षेत त्यांना उत्तरे लिहिताना सोपे जाते.

७. शिक्षकांनी अध्यापनात सराव पुनरावृत्तीस भर द्यावी, शिक्षकांचे अध्यापन विद्यार्थ्यांच्या अध्ययनात अभिरुची निर्माण करणारे असावे.

८. एक घटक शिकवून झाला की शिक्षकांनी त्यावर चाचणी घ्यावी.

९. शिक्षकांनी विद्यार्थ्यांत आत्मविश्वास निर्माण करावा.

१०. विद्यार्थ्यांना नैतिक मुल्यांची जाणीव करुन द्यावी.

११. विद्यार्थ्यांचे शंकानिरसन करावे.

१२. शिक्षकांचे कुशल अध्यापन व विद्यार्थ्यांची प्रामाणिकता कॉपी समस्येला रोखू शकते.

१३. वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे प्रगती अहवाल द्यावेत सोबत त्यांतील सुधारणा बाबत योग्य मार्गदर्शन करावे.

## ६ पालक शिफारशी :–

१. पालकांनी आपल्या इच्छा विद्यार्थ्यांवर न लादता त्याच्यात अभ्यास करण्याची आवड निर्माण करावी.

२. आपल्या पाल्यांच्या क्षमता ओळखून त्यांची इतरांशी तुलना करण्याची टाळावी.

३. आपल्या अवास्तव अपेक्षांचे ओक्षे पाल्यांवर न लादता त्याच्या भावना, आवड ओळखून अभ्यासाबरोबरच त्यांचे कलागुण कसे विकसित करता येतील यावर भर दिला पाहिजे.

४. पालकांनी आपल्या पाल्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

५. अभ्यासाच्या चांगल्या सवयी जोपासाव्यात.

६. शाळेत पहिला नंबर आलाच पाहिजे म्हणून अट्टाहास धरु नये.

## ७ शाळा शिफारशी :–

१. कॉपी केल्याने फार काही बिघडत नाही ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

२. अभ्यासाबद्दल उदासिन दृष्टिकोन ठेऊ नये.

३. परीक्षेचा उगाचाच बाऊ करुन घेऊ नये.

४. काहीही कष्ट न करता उत्तम यश मिळत नसते त्यासाठी अभ्यास करावा लागतो.

## • संदर्भ ग्रंथ सूची–

१. पाटील, यु. ए., तांबे, एस., दरेकर, एस. एन., नांदेडे, जी., गुंजाळ, ए., (२०११), गैरमार्गा विरुध्द लढा, शिक्षण संक्रमण एम एस सी आर टी पुणे, वर्ष ४५, अंक ४–५.

**2-** Internet : -

1. http://www.aboutdepression.html 8/9/2011